राज्य उत्पादन शुल्क विभागातील अधिकारी/ कर्मचारी यांच्या वयाच्या ५०/५५ व्या वर्षानंतर, सेवा पुनर्विलोकनाकरिता विभागीय पुनर्विलोकन समिती गठित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांक:- पीईएन-१०१९/प्र.क्र.७६/राउशु-१,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २९ जून, २०१९

वाचा:- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एलपीएल-२०१७/प्र.क्र.२१/का.पंधरा, दि.१०.०६.२०१९.

शासन निर्णय -

अधिकारी/कर्मचाऱ्यांचे, वयाच्या ५०/५५ व्या वर्षी अथवा ३० वर्षे अर्हताकारी सेवा यापैकी जे अगोदर घडेल त्यावेळी, सेवा पुनर्विलोकन करणेबाबत सामान्य प्रशासन विभागाने दि.१०.०६.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये सूचना दिलेल्या आहेत. त्यास अनुसरून, राज्य उत्पादन शुल्क विभागातील १) गट-अ (राजपत्रित) (वरिष्ठ वेतनश्रेणी) ग्रेड वेतन ७६०० व त्यापेक्षा अधिक परंतु १०००० पेक्षा कमी संवर्गातील अधिकारी, २) गट-अ (राजपत्रित) (कनिष्ठ वेतन श्रेणी) ग्रेड वेतन ७६०० पेक्षा कमी संवर्गातील अधिकारी तसेच ३) गट-ब (राजपत्रित) संवर्गातील अधिकारी यांच्या सेवापुनर्विलोकनाकरिता पुढीलप्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे.

१	राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अ.मु.स./प्रधान सचिव/सचिव.	अध्यक्ष
२	सह/उप सचिव, गृह (राज्य उत्पादन शुल्क) विभाग.	सदस्य क्र.१
३	सह/उप सचिव, गृह (परिवहन) विभाग	सदस्य क्र.२
४	कार्यासन अधिकारी, गृह (राज्य उत्पादन शुल्क), कार्यासन क्र.१	सदस्य सचिव

२. आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे विभागातील संबंधित अधिकाऱ्यांच्या सेवापुनर्विलोकनाबाबचा प्रस्ताव वेळोवेळी शासनास सादर करतील. सदर समिती त्यांच्या शिफारशी अंतिम निर्णयासाठी समुचित प्राधिकाऱ्यांना सादर करील. तसेच विभागीय पुनर्विलोकन समितीच्या शिफारशीनुसार जे गट-अ आणि गट-ब चे अधिकारी सेवेत चालू राहण्यास निर्विवादपणे अपात्र ठरणार असतील अशा अधिकाऱ्यांचे पुनर्विलोकन, संदर्भाधीन दि.१.०६.२०१९ च्या शासन निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे सामान्य प्रशासन विभागाच्या "विशेष पुनर्विलोकन समिती"कडून केले जाईल.

३. राज्य उत्पादन शुल्क विभागातील गट-अ (राजपत्रित) (कनिष्ठ वेतन श्रेणी) ग्रेड वेतन ७६०० पेक्षा कमी आणि गट-ब (राजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्यांच्या सेवापुनर्विलोकनाअंती सेवा पुढे चालू ठेवण्यास निर्विवादपणे अपात्र ठरलेल्या नोटीस बजावण्यात आलेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्या अभिवेदनावर विचार करण्यासाठी पुढीलप्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे.

१	राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अ.मु.स./प्रधान सचिव/सचिव.	अध्यक्ष
२	सह/उप सचिव, गृह (विदेशी) विभाग.	सदस्य
३	कार्यासन अधिकारी, गृह (राज्य उत्पादन शुल्क), कार्यासन क्र.३	सदस्य सचिव

सदर समिती त्यांच्या शिफारशी अंतिम निर्णयासाठी समुचित प्राधिकाऱ्यांना सादर करील.

४. सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधीन दि.१०.०६.२०१९ रोजीच्या शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या कार्यपद्धती व सूचनांनुसार, या विभागातील अधिकारी/कर्मचाऱ्यांची सेवा पुनर्विलोकन करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०६२९१५५०११३६२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

P H WAGDE

Digitally signed by P H WAGDE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=26d7295f0f289d96eecb9e12c2850ebd4f894edc0ea69760a3c1561515a6bf87, postalCode=400032, street=MANTRALAYA ,MUMBAI, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=P H WAGDE
Date: 2019.06.29 15:54:14 +05'30'

(पु. हि. वागदे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति:

१) आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
३) राज्य उत्पादन शुल्क विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारीवृंद (मार्फत आयुक्त, राउशु)
४) कार्यासन अधिकारी, राउशु-२/३, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) निवडनस्ती (राउशु-१).

प्रत माहितीस्तव:

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. मंत्री (राउशु) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) प्रधान सचिव (राउशु) यांचे वरीष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.